संजीवन ग्रामीण वैद्यकीय व सामाजिक सहाय्यता प्रतिष्ठान

संचलित

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
# ओंदे

## ता. विक्रमगड, जि. पालघर, पिन - ४०१ ६०५

(मुंबई विद्यापीठाशी संलग्न)

# माहिती पत्रक
## PROSPECTUS

• **E-mail:** ondecollege@yahoo.com / ondecollege401605@gmail.com

विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहिती पत्रक पूर्ण वाचावे व त्यातील सूचनेनुसार प्रवेश अर्ज स्वहस्ताक्षरात भरावा. माहिती पत्रकातील नियमांचे पालन काटेकोरपणे केले पाहिजे.

# संदेश

संस्थेचे संजीवन ग्रामीण वैद्यकीय व सामाजिक सहायता प्रतिष्ठान या संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी माहिती पत्रक प्रसिध्द करीत आहे. आनंद वाटला ! महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबर सामाजिक बांधीलकीचे व्रत जीपासले आहे. त्याचे प्रत्यंतर महाविद्यालय राबवित असलेल्या विविध शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांतून पाहावयास मिळते.

आज महाविद्यालयाच्या तिन्ही शाखांमध्ये जवळपास ६०० विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. यातील बहुतांश विद्यार्थी हे त्यांच्या कुटूंबातील पहिले पदवीधर असण्याची शक्यता आहे. या सर्व विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात सामावून त्यांचे व्यक्तिमत्व सर्वार्थाने विकसीत करण्याचे महत्वपूर्ण काम महाविद्यालय करीत आहे. महाविद्यालयाच्या आजवरच्या कारकिर्दीवर नजर टाकल्यास महाविद्यालयाने कला, क्रीडा आणि सांस्कृतिक बाबतीत चांगली कामगिरी केलेली आहे. या सर्वांचा विद्यार्थांना चांगला फायदा होत आहे. आज महाविद्यालयातून पदवीधर झालेले अनेक विद्यार्थी शासनाच्या आणि खाजगी क्षेत्राच्या विविध विभागात सेवा बजावून राष्ट्र आणि समाजाच्या विकासाकरीता आपले योगदान देत आहेत. हे विशेष !

यापुढेही हे महाविद्यालय ज्ञानाच्या आणि कला-सांस्कृतिक क्षेत्राशी अधिकाधिक समरस होवून काम करील, अशी मला खात्री आहे. या माहिती पत्रकाच्या रुपाने विद्यार्थी आणि समाजाप्रती निष्ठा बाळगणारे हे महाविद्यालय यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत करो, हिच शुभेच्छा !

**मा.श्री. व्ही. जी. पाटील,**
अध्यक्ष, संजीवन ग्रामीण वैद्यकीय व
सामाजिक सहायता प्रतिष्ठान, ओंदे
ता. विक्रमगड, जि. पालघर.

# अभिप्राय

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ओंदे हे सन २००२ पासून कार्यरत असून ते विक्रमगड या आदिवासीबहूल तालुक्यातील एकमेव महाविद्यालय आहे.

ओंदे हे गांव महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यात आहे. मुळात विक्रमगड हा तालुका आदिवासी असून या परिसरातील लोक अनेक वर्षापासून उच्च शिक्षणापासून वंचीत राहीले. उच्च शिक्षणाची किमया त्यांना माहित नव्हती, म्हणून त्यांचा आर्थीक आणि सामाजीक विकास खुंटला होता. २१ व्या शतकात शिक्षण हे अज्ञानरुपी अंधकार दुर करुन आपला अतुल्य विकास साधुन घेण्याचे शस्त्र बनलेले आहे. याच सामाजीक विचाराने प्रेरित होऊन मा. व्ही. जी पाटील यांनी स्वतःला वाहुन घेतले व दृढनिश्चयी कार्यकर्त्यांच्या समवेत स. ग्रा. वै. सामाजीक सहायता प्रतिष्ठान या संस्थेची स्थापना सन १९९० मध्ये केली आहे. या संस्थेने काळाची पाऊले ओळखून शिक्षण क्षेत्रात येण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेवून, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना शैक्षणिक वर्ष २००२ - २००३ मध्ये केली. महाविद्यालयाची सुरुवात फक्त ६५ विद्यार्थ्यांनी झाली. आजतागायत हजारो विद्यार्थी या महाविद्यालयातून त्यांचे उच्च शिक्षण पूर्ण करुन आपल्या कुंटूबाला हातभार लावत आहेत.

सुरुवातीला दुर्गम डोंगराळ आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची कवाडे खुली व्हावीत हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन महाविद्यालयाची वाटचाल सुरु झाली. अतिशय कठीण परिस्थितीत लावलेल्या महाविद्यालयाच्या या बीजाला अंकूर फुटून आज त्याचे एका वटवृक्षात रुपांतर झाले आहे. दरम्यानच्या खडसर काळात रोपट्यांची काळजी घेण्याचे, त्यांचे सर्वधन करण्याचे काम संस्थेचे अध्यक्ष मा. व्ही. जी. पाटील यांनी यशस्वीरीत्या केले. त्यांच्या या कार्यात मोलाची साथ दिली, त्यांच्या धर्मपत्नी सौ. वंदनाताई पाटील यांनी. सुरुवातीच्या खडतर काळात विद्यार्थ्यांच्या आई होऊन त्यांनी त्यांना आश्रय तर दिलाचं परंतू स्वतःच्या हातांनी स्वयंपाक करुन त्यांना जेवू घातले. विद्यार्थ्यांच्या अडिअडचणीत, आजारपणात त्यांनी सेवा सुश्रृषा केली.

आज महाविद्यालयात ६०० च्या वर विद्यार्थी शिक्षण घेत असून ते बहुतांश मागास समाजातून आलेले आहेत. मुंबई विद्यापिठाने ठरवून दिलेल्या शैक्षणिक अभ्यास क्रमाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण कलागुणांना वाव देण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न महाविद्यालय करीत आहे. दरवर्षी महाविद्यालयाच्या तिन्ही शाखांचा निकाल उत्तम प्रकारे लागतो आहे. आजपर्यंत

महाविद्यालयातून पदवी घेवून बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी सार्वजनिक व शासनाच्या विविध क्षेत्रात आपल्या क्षमतेनुसार स्वतःच्या कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटवीत आहेत. हे महाविद्यालयाचे निर्मळ यश आहे. पारंपारिक शिक्षणाबरोबरच जीवनात यशस्वी होण्यासाठी विविध स्पर्धापरिक्षांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना महाविद्यालयामार्फत केले जाते.

महाविद्यालयाचा बहुतांश प्राध्यापक वर्ग उच्चविद्याविभूषीत व उत्तम शैक्षणिक पार्श्वभुमी असलेला आहे. विद्यार्थी फक्त पदवीधर होऊन बाहेर न पडता तो आपल्या जीवनांत यशस्वी व्हावा यासाठी तो आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. म्हणूनच या महाविद्यालयाच्या दरवर्षीच्या वार्षिक निकालाकडे नजर टाकल्यास उत्तरोत्तर हा निकाल उंचावत गेल्याचे आपल्या निदर्शनास येते. प्रस्तूत महाविद्यालय जरी दुर्गम भागात असले तरी आदिवासी संस्कृती, इथला समृध्द वारसा, प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची वृत्ती यांच्या जोरावर हे महाविद्यालय येणाऱ्या काळात मुंबई विद्यापिठातील एक आदर्श महाविद्यालय असेल यात शंका नाही.

यावर्षी महाविद्यालय १६व्या वर्षात पदार्पण करीत आहे. उत्तम शैक्षणिक योगदानाबरोबरच सामाजिक बांधिलकीही महाविद्यालयाने तितक्याच आस्थेने जोपासली आहे. माहितीपत्रकांच्या निमित्ताने या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानाजर्नाचा हा वृक्ष असाच निरंतर बहरत रहाणार यात शंका नाही.

**प्राचार्य**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ओंदे

## महाविद्यालयातील प्रवेशासंबधीचे नियम :

१) प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखांची प्रवेश प्रक्रीया मुंबई विद्यापिठाने Online केलेली आहे. विद्यार्थ्यांने माहिती पुस्तक (Prospectus) महाविद्यालयातून प्राप्त करुन नंतर स्वतः Online अर्ज संगणकाव्दारे भरावयाचा असून त्यांची 'Printout' अर्ज व इतर कागदपत्रे महाविद्यालयात विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवेश मिळणार नाही. तसेच Online अर्ज व्यवस्थित, योग्यपध्दतीने भरला गेला नाही किंवा महाविद्यालयात अनुषंगीक कागदपत्रे विहीत मुदतीत सादर केली नाहीत व विहीत मुदतीत विद्यापिठाला नाव नोंदणी झाली नाही या बाबतीत प्रवेश रद्द झाला तर यास संबंधीत विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील. नाव नोंदणी (Enrolment Confirmation) झाली तरच PRN (Permanent Registraction Number) मुंबई विद्यापिठाकडून प्राप्त होईल. वरील सर्व प्रक्रियेसाठी मुंबई विद्यापिठ वेबसाईट - www.mu.ac.in या digitalmumbaiuniversity ह्या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती उपलब्ध आहे.

२) महाविद्यालयामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांने अधिकृत छापील अर्ज भरुन प्राचार्यांकडे व्यक्तिशः सादर करावा. प्रवेश प्रक्रीयेत ग्रामीण आदिवासी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. प्राचार्यांच्या अधिकृत संमतीशिवाय व आवश्यक शुल्क भरल्याशिवाय अधिकृत प्रवेश दिला जाणार नाही.

३) **प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे :**

अ) कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला मुळ व साक्षांकित प्रती - ३

ब) १२ वीच्या परीक्षेचे गुणपत्रक व त्याच्या साक्षांकीत प्रती - ३

क) उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकीत प्रती - १

ड) जातीच्या दाखल्याची साक्षांकीत प्रत - ३

इ) उत्पन्नाचा दाखला

४) प्रवेश अर्जावर पासपोर्ट आकाराचे अगदी अलिकडचे छायाचित्र चिकटवलेले असावे.

५) प्रवेश एका शैक्षणिक वर्षासाठी अधिकृत मानला जाईल. प्रत्येक वर्षी नव्याने प्रवेश अर्ज करणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थ्याने प्राचार्यांकडे कॉलेज सोडण्याविषयी लेखी कळविले नसल्यास त्याला एकदा प्रवेश दिल्यानंतर त्याची नोंद संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी नोंदविले आहे असे समजण्यात येईल. पहिल्या सत्रानंतर नाव काढून घ्यावयाचे असल्यास दुसरे सत्र सुरु होण्याच्या किमान एक आठवडा आधी प्राचार्यांना तशी लेखी सुचना देणे आवश्यक आहे. तशी सुचना न मिळाल्यास दुसऱ्या सत्राचे संपूर्ण शुल्क आकारले जाईल.

७) तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील कोणत्याही वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने खालील कागदपत्रे सादर करावीत.

अ) गुणपत्रिका मागील अभ्यासक्रम.

ब) पात्रतेचा दाखला (मुंबई विद्यापिठाखेरीज अन्य विद्यापिठातून आले असल्यास पात्रता प्रमाणपत्र (Eligibility certificte) असल्यास आणि जिल्हा बदलाचा दाखला (मुंबई विद्यापिठाच्या अन्य कोणत्याही महाविद्यालयात शिकत असल्यास) सादर केले पाहिजे.

सादर करणे अनिवार्य आहे.

अर्जाची मुदत, अर्जातील बदल या संबंधीच्या माहितीसाठी विद्यार्थ्यांनी वेबसाईटची पाहणी वेळोवेळी करुन घेणे गरजेचे आहे. तसेच महाविद्यालयातील सुचना फलक वेळोवेळी पाहणे. ही योजना SC, NT,OBC, CBC Schorlarshp/ Freeship विद्यार्थ्यांसाठी शै. वर्ष २०११ - २०१२ पासून सुरु आहे. आणि ST Schorlarshp/ Freeship विद्यार्थ्यांसाठी शै. वर्ष २०१२-२०१३ पासून सुरु आहे.

१) SC, NT, OBC, SBC Schorlarshp/ Freeship विद्यार्थ्यांसाठी अर्ज मा. समाज कल्याण अधिकारी, ठाणे यांच्या सुचने प्रमाणे Mahaeschol. maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध होतील.

२) ST - Schorlarshp/ Freeship विद्यार्थ्यांचे अर्ज प्रकल्प अधिकारी, जव्हार यांच्या http: // etribal.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध होतील.

मागील वर्षी भरलेल्या Online अर्जाचा Prinout प्रवेश घेते वेळी सादर करणे आवश्यक आहे. मागील वर्षांचा Online अर्जाचा Prinout सादर करतांना त्यावर मागील शै. वर्ष, हजेरी क्रमांक, Cast, Schoarship/ freeship राष्ट्रीयकृत बँकेचे खाते नंबर इत्यादी माहिती ठळक व स्वच्छ हस्ताक्षरात लिहिने बंधकारक आहे.

विहीत मुदतीत अर्ज/ Printout सादर न केल्यास विद्यार्थ्यांना / फी माफी मिळणार नाही आणि त्यांच्या कडून फी ची संपूर्ण रक्कम वसूल केली जाईल.

## बस पास सवलत :

महाराष्ट्र शासनाच्या राज्य परिवहन मंडळ यांच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी बस पास सवलत महाविद्यालयाकडून पुरवली जाईल.

## परीक्षा :

विद्यापिठाच्या नियमानुसार प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या परीक्षांना सेमिस्टर पध्दत लागु करण्यात आली आहे. सेमिस्टर शैक्षणिक वर्षात दोन परीक्षा होतात. विद्यापिठाच्या नियमानुसार या परिक्षासाठी स्वतंत्र परिक्षा शुल्क भरावे लागले. सत्र परिक्षेला पात्र होण्यासाठी किमान ७५ टक्के हजेरी असणे अनिवार्य आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शासन नियमाप्रमाणे परीक्षा शुल्क शिष्यवृत्तीतून कपात केली जाते. त्यासाठी विद्यार्थ्याने तसा अर्ज करावा.

## ग्रंथालय :

महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज असून अभ्यासक्रमाच्या पुस्तकासह अनेक संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहेत. सर्व विषयांना वाहिलेली अनेक मासिके आहेत. स्पर्धा परिक्षाचा एक स्वतंत्र विभाग निर्माण करण्यावर ग्रंथालय भर देत आहे.

स्पर्धा परिक्षासाठी विविध मासिके उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना गरजेनुसार मासिके, दैनिक व अभ्यास पूर्ण पत्रिका वेळच्यावेळी उपलब्ध करुन दिली जातात.

महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, क्रीडा, संस्कृती या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याचा महाविद्यालय प्रयत्न करते त्यात -

१. विविध खेळ
२. नाट्य व सांस्कृतीक कार्यक्रम
३. वादविवाद व वकृत्व स्पर्धा
४. शैक्षणिक सहली
५. भित्ती पत्रके
६. निबंध स्पर्धा
७. व्यक्तीमत्व विकास शिबिरे

तज्ज्ञ प्राध्यापकांकडून वरील उपक्रमा बाबतचे मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जाते. प्राचार्यांच्या पुर्व परवानगी शिवाय कोणताही खेळ किंवा उपक्रम घेतला जात नाही. महाविद्यालयीन क्रिडा व सांकृतीक मंडळ समिती या उपक्रमांचे आयोजन करते.

महाविद्यालयीन क्रिडा व सांस्कृतीक मंडळ महाविद्यालयाच्या खेळ व अभ्यासानुवर्ती कार्यक्रमाचे कामकाज पाहते. या समितीत विद्यार्थ्यी प्रतिनीधी, प्राध्यापक व प्राचार्य यांचा समावेश असतो. प्राचार्य या समितीचे अध्यक्ष असतात. प्राध्यापक आणि प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना लोकशाही जीवनपध्दतीचे एक प्रकारचे शिक्षण दिले जाते.

## राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.)

शिक्षणाला सामाजिक जोड देण्याच्या उद्देशाने व त्यातुन शिक्षण अधिक जीवनसन्मुख करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमाची महाविद्यालयाने प्रारंभापासून सुरुवात केली आहे यात -

१. विद्यापिठाने मंजुर केलेल्या संख्येइतक्या विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश दिला जाईल.
२. राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना उपस्थिती, शिस्त व शिबिरातील काम इ. संबंधीच्या केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.
३. ज्या विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यात दोन वर्षात २४० तास काम समाधानकारक केले आहे. अशा स्वयंसेवकांना प्रमाणपत्र व विद्यापिट अधिनियमासनुसार विद्यापिठ परीक्षेत १० सवलतीचे गुण दिले जातील.
४. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ७ दिवसांच्या विशेष शिबिरास उपस्थित रहाणे बंधनकारक राहील.

## उपस्थिती :

१. शैक्षणिक वर्षातील प्रत्येक सत्रात एकूण कामाच्या दिवसांपैकी किमान ७५ टक्के दिवस हजर असणे सत्र पुर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांस आवश्यक आहे.
२. वेळापत्रकानुसार प्रत्येक दिवशी जे तास असतील त्या सर्व तासांना उपस्थित असल्यास दिवसाची उपस्थिती समजण्यात येईल.
३. अधिकृतपणे सत्र पूर्ण करण्यासाठी ७५ टक्के दिवस महाविद्यालयातील तासांना हजर राहणे, समाधानकारक प्रगती करणे, चांगली वर्तणूक ठेवणे व सर्व फी वेळेवर भरणे आवश्यक मानली जाईल.
४. महाविद्यालयाची आचारसंहिता सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

## महाविद्यालयातील आचारसंहिता :

विद्यापिठकायद्यानुसार अंतर्गत अनुशासन व व्यवहार या सबंधी नियम करण्याचे व नियमांचा भंग करणाऱ्यावर कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार महाविद्यालयाच्या प्राचार्यांना आहेत. प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील. महाविद्यालयात शिस्तपूर्ण वातावरण व चांगले शिक्षण कार्य चालावे यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांने या आचारसंहितेतील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

## नियम

१. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने वर्गात, महाविद्यालयाच्या परिसरात किंवा महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कोणत्याही कार्यक्रमात वावरतांना आपले ओळखपत्र नेहमी आपल्याजवळ बाळगावे. प्राध्यापक, कर्मचारी किंवा शिपायाने मागितल्यास हे ओळखपत्र सादर केले पाहिजे.

२. प्रत्येक विद्यार्थ्यांने वेळापत्रकानुसार प्रत्येक तासाला पूर्ण वेळ उपस्थित राहणे आवश्यक आहे. कोणत्याही एका तासाची अनुपस्थिती ही पूर्ण दिवसाची अनुपस्थिती समजली जाईल. प्रत्येक सत्रात स्वतंत्र पणे ७५ टक्के उपस्थिती असल्या शिवाय परिक्षेत बसण्याची परवागनी दिली जाणार नाही.

३. प्रथम सत्र परीक्षा आणि ट्युटोरिअल्स/ प्रकल्प अहवाल अनिवार्य आहे. ज्या विषयाला ट्युटोरिअल्स/ प्रकल्प अहवाल आहेत ते सादर केल्या शिवाय परिक्षेस बसता येणार नाही. परिक्षेबाबत वेळोवेळी होणारे बदल लक्षात घ्यावे.

४. महाविद्यालयात होणाऱ्या प्रत्येक परिक्षेत विद्यार्थ्यांने उपस्थित राहिले पाहिजे. परिक्षेस किंवा अध्यापन तासांना अनुपस्थित राहण्यासाठी प्राचार्यांची अनुमती घ्यावी लागेल.

५. पुर्व परवानगीशिवाय अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यावर कार्यवाही करण्यात येईल. अध्यापन तास व परिक्षेतील उपस्थिती व प्रगती समाधानकारक नसलेल्या विद्यार्थांचे नाव काढून टाकण्यात येईल. व अशा विद्यार्थ्यास महाविद्यालयाच्या किंवा विद्यापिठाच्या परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

६. एखादा विद्यार्थ्यी आजारी असल्यास त्याने डॉक्टरांकडून प्रमाण पत्रासह लेखी अर्ज पाठवून प्राचार्यां कडून रजा मागावी.

७. तास चालू असतांना वर्गात आपसात बोलणे, वर्गात उशिरा येणे किंवा वर्गातून मधूनच उठून जाणे, अध्यापनात अडथळे निर्माण करणे, प्राध्यापक व कर्मचारी वर्गाशी वाद घालणे, कोणाशीही असभ्य भाषेत बोलणे, असभ्य गैरवर्तन करणे, आज्ञाभंग इत्यादी प्रकारची गंभीरपणे दखल घेतली जाईल व सबंधीत विद्यार्थ्यांवर कडक कार्यवाही करण्यात येईल.

८. महाविद्यालयीन परिसरात वावरतांना आपल्या वागण्यामुळे महाविद्यालयाचे कर्मचारी, इतर वर्ग विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही याची प्रत्येक विद्यार्थ्यांने काळजी घ्यावी.

९. महाविद्यायीन कर्मचारी, प्राध्यापक व प्राचार्य यांच्या स्वातंत्र्यास बाधा येईल अशा कोणत्याही प्रकारच्या आंदोलनात सहभागी होण्यास महाविद्यालयाची मनाई आहे.

१०. महाविद्यालयीन संपत्ती साधनांची मोडतोड व हानी होणार नाही याची प्रत्येक विद्यार्थ्यांने काळजी घ्यावी. साधन संपत्तीस हानी पोहचविणाऱ्यावर भरपाईचा दंड आकारण्यात येईल.

अशा प्रकारचे नुकसान करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई करून त्याच्याकडून भरपाई वसुल करण्यात येईल.

११. प्राचार्यांच्या पूर्वअनुमतीशिवाय महाविद्यालय व महाविद्यालयाच्या नावाने बाहेर कोणताही कार्यक्रम आयोजित करता येणार नाही. अथवा अन्य स्पर्धांत प्राचार्यांच्या पुर्व परवानगीशिवाय महाविद्यालयाच्या नावाने भाग घेता येणार नाही.

१२. महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेस धक्का पोहचेल किंवा प्रशासनास बाधा उत्पन्न होईल असे कोणतेही वर्तन विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयात किंवा बाहेर कोठेही घडल्यास अशा विद्यार्थ्यांचे नाव काढून टाकण्यात येईल.

१३. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व महाविद्यालयाद्वारा आयोजित अन्य राष्ट्रीय कार्यक्रम यांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

१४. महाविद्यालयीन किंवा विद्यापिठ पातळीवर परीक्षांमध्ये कॉपी करणे किंवा इतर गैरप्रकार करणे हा दखलपात्र गुन्हा आहे. याची नोंद घ्यावी.

१५. सुचना फलकावर वेळोवेळी लावलेल्या सुचना पाहून त्यानुसार त्या-त्या सुचना अमलात आणाव्यात.

१६. प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे अनुशासन व नियमांचे पालन करण्यासबंधी हमीपत्र स्वतः च्या व आपल्या पालकांच्या सहीनिशी महाविद्यालयात सादर करावे.

१७. महाविद्यालयाने/ विद्यापिठाने/शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले बदल बंधनकारक असतील.

१८. एकदा महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर योग्य कारणाशिवाय ना हरकत प्रमाणपत्र (एन्.ओ.सी.) दिले जाणार नाही.

१९. विद्यार्थी अथवा विद्यार्थीनीची रॅगींग करणे कायद्याने गुन्हा आहे.

२०. महाविद्यालयाच्या परिसरात धुम्रपान करणे कायद्याने गुन्हा आहे.

## हमीपत्र (नमुना)

**श्रीमान प्राचार्य महोदय,**

मी आपल्या महाविद्यालयाचे अनुशासन व शिस्तीसंबंधीचे सर्व नियम काळजीपूर्वक वाचले आहेत. व ते मला मान्य आहेत. या नियमांचे पालन करण्याची मी आपणांस हमी देतो/देते. माझ्या कडून कोणत्याही नियमांचा भंग झाल्यास त्याबाबत आपला निणर्य मला बंधनकारक राहील व या संदर्भात मी कुठेही तक्रार करणार नाही.

विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव :- ______________________ सही

पालकाचे पूर्ण नाव :- ______________________ सही

दिनांक :

## CAST CERTIFICATE

### (For B.C./ O.B.C./S.B.C. Students)

Students can submit their application for getting caste certificate through college office which will be verified by Tahisildar Office, subsequently.

सेतू कार्यालये जातीचा दाखला आणि नॉन क्रिमिलेर सर्टिफिकेट आणि उत्पनाचा दाखला प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करतात.

For guidunce students may approach concerned teachers.

## CAST VALIDITY CERTIFICATE

### (For B.C./ O.B.C./S.B.C. Students)

Applications for getting caste validity certificate will be forwarded alongwirh required papers for benefit of students to pursue higher studies etc. Students can contact college office before 30th Sept. for the same.

### जात वैधता प्रमाणपत्रासाठी (Cast Valitity Certificate) लागणारी सर्वसाधारण कागदपत्रांची यादी.

१. अर्जदाराचे जात प्रमाणपत्र (नं.३३८/२००८)
२. अर्जदाराचा शाळा सोडल्याचा दाखळा
३. वडिलांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
४. काकांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
५. आत्यांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
६. आजोबाचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र
७. वडील/काका/आत्या/आजोबा यांचा जन्म उतारा
८. महसुल कागदपत्रे
९. कुटूंबातील कोणत्याही सदस्याने जात वैधता प्रमाणपत्र धारण केले आहे व जो वडिलांच्या रक्तनात्यातील आहे, त्याचे नाव व नातेसबंध नमूद करा.
१०. शपथपत्र

## GROUP INSURANCE COVERAGE AVAILABLE FOR STUDENT AS PER GOVERNMENT NORMS.

**Vision :** The Vision of Arts, Commerce and Science College is "To provide value-based higher education to the poor, needy and deprived Student in this trible area so as to bring them into the mainstream of development".

**Mision :** To bring the needy, poor and deprived students onto the mainstream of development through education. To inculcate human values, integrity, nationality and social commitment among the students in building nation best.

To make the students globally competent and responsible citizens.

## THE BROAD CATEGORIES OF UNFAIR MEANS RESORTED TO BY STUDENTS AT THE UNIVERSITY/COLLGE/INSTITUTION EXAMINATION AND THE QUANTUM OF PUNISHMENT FOR EACH CATEGORY

| | Nature of Malpractice | Quantum of Punishment |
|---|---|---|
| 1. | Possession of coping material | Annulment of the performance of the student at the University/College/Institution examination in full.* (Note- This quantum of punishment shall also to the following categories of malpractice at Sr.No.(2) to Sr. No (12) in addition to the pulishment prescribed there at.) |
| 2. | Actual copying from the copying material | Exclusion of the student from University or College or Institution examination for one additional examination. |
| 3. | Possession of another student's answer book | Exclusion of the student from University or College or Institution examination for one additional examination for one addiional examination.(BOTH THE STUDENTS.) |
| 4. | Possession of another student's answer book+actul evidence of copying therefrom | Exclusion of the student from University or College or Institution examination for one additional examination. (BOTH THE STUDENTS.) |
| 5. | Mutual / Mass Copying | Exclusion of the student from University or College or Institution examination for two additional examinations. |
| 6. | i) Smuggling-out or Smuggling in of answerbook as copying material. | Exclusion of the student from University or College or Institution examination for two additional examinations. |
| | ii) Smuggling-in of written answerbook based on the question paper set at the examination | Exclusion of the student from University or College or Institution examination for three additional examinations. |
| | iii) Smuggling in written answerbook and forging signature of the Jr. Supervisor thereon | Exclusion of the student from University or College or Institution examination for four additional examinations. |

| Nature of Malpractice | Quantum of Punishment |
|---|---|
| 7. Attempt to forge the signature of the Jr. Supervisor on the answerbook or supplement | Exclusion of the student from University or College or Institution examination for four additional examinations. |
| 8. Interfering with or counterfeiting of University/College/Institution seal, or answerbook of office stationery used in the examinations. | Exclusion of the student from University or College or Institution examination for four additional examinations. |
| 9. Answerbook, main or supplement written outside the examination hall or any other insertation in answerbook. | Exclusion of the student from University or College or Institution examination for four additional examinations. |
| 10. Instion or crrencey notes/to bribe or attempting to bribe any of the person/s conncected with the conduct of examinations. | Exclusion of the student from University or College or Institution examination for four additional examinations. Note-This money shall be credited to the vice Chancellor's fund |
| 11. Using language/voilence threat at the examination center by a student at the University/College/Supervisor/Chief Conductor or Examiners. | Exclusion of the student from University or College or Institution examination for four additional examinations. |
| 12. a) Impersonation at the University/ College/Institution examination.<br>b) Impersonation by a University/ College/Institution Student at S.S.C./H.S.C./Any other examinations. | Exclusion of the student from University or College or Institution examination for five additional examinations.(Both the students if impersonator is University or College or institute student.) |
| 13. Written or in any other part of the answer book by the student at the University or College or Institution examination. | Exclusion of the student from University or College or Institution examinations for five additional examination. |
| 14. Found having written on palms or on the body, or on the clothes while in the examination. | Annulment of the performance of the student at the University or College or Institution examinations in full. |
| 15. All other malpractices not covered in the aforesaid categories. | Annulment of the perfomance of the student at the University or College or Institution examination in full and severe punishment depending upon the gravity of the offence. |

16. If no previous occasion a disciplinary action was taken against a student for malpractice used at examination and he/she is caught again for malpractice used at the examination, In this event he/shen shall be dealt with severely, enhanced punishment can be imposed on such student & this enhance punishment may extend to double the pulishment provided for the offence, when committed at the second or subsequent examination.

17. PRACTICAL/DISSECTATION/PROJECT REPORT EXAMINATION
Student involved in malpractices at Practical/Dissertion/Project Report examination shall be dealt as per the punishment provided for the theory examination.

18. The Competent Authority, in addition to the above mentioned pulishment, may impose a fine not exceeding Rs.300/- on the Student declared guilty.

**(NOTE : THE TERM "ANNULMENT OF PERFORMANCE IN FULL" INCLUDES PEREFOMANCE OF THE STUDENT AT THE THEORY AS WELL AS ANNUAL PRACTICAL EXAMINATION, BUT DOES NOT INCLUDE PEREFORMANCE AT TERM WORK, PROJECT WORK & DISSERT-ATION EXAMINATION UNLESS MALAPRACTICE USED THERE AT).**

## RAGGING :

Addmission will not be granted to students, found, involved in Ragging. Similarly admission will be cancelled, if it is detected at a later stage that concerned students were involved in Ragging practices.

* सिगारेट व तंबाखूपासूनची उत्पादने नियम -२००९ मधील नियम -३ नुसार सिगारेट, तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ, उत्पादने व वस्तु विक्रिस विद्यापीठ परिसाराच्या व महाविद्यालयाच्या परिसराच्या १०० यार्ड अंतरावर बंदी आहे.

* शैक्षणिक संस्थांच्या परिसरात सिगारेट, तंबाखू व तंबाखूपासून बनविलेली उत्पादने/ वस्तु विक्री केल्यास याच अधिनियमाच्या नियम -२४ अन्वये रु.२०० पर्यंत विक्रि करणाऱ्यास दंड करणेबाबतची तरतुद आहे.

संदर्भ-


१. भारत का राजपत्र- असाधारण भाग ।। खंड ३ -उपखंड (१)ए नई दिल्लीए मंगलवार जनवरी १९,२०१०

२. मा.सहसंचालक, महाराष्ट्र शासनए कोकण विभाग, पनवेल यांचे परिपत्रक क्र. सहसं/उशि/कोविप/परिपत्रक/२०११/६३ दि.७/१/२०११


**विषय : शैक्षणिक संस्थांमध्ये होणाऱ्या मुलींच्या छेडछाडीस प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणेबाबत.**

**संदर्थ: मा.विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कोकण विभाग, पनवेल याजकडील पत्र क्र.सहसं/उशि/कोविप/मुलींची छेडछाड/२०१२/५२५ दि.१७/४/२०१२.**

**विद्यार्थिनी व महिलाएँ यांचा विनयभंग तसेच छेडछाड तत्सम अप्रिय व चीड आणणाऱ्या घटना घडल्यास-दोषींवर कठोर कारवाई ज्यात फौजदारी गुन्हा दाखल करावयास सुध्दा कुचराई करण्यास येणार नाही. पिडीतांनी तक्रार केल्यास व साहस दाखविल्यास प्रतिबंधात्मक उपाय योजना महिला तक्रार निवारण समिती मार्फत निश्चितच करता येईल.**

संजीवन ग्रामीण वैद्यकीय व सामाजिक सहाय्यता प्रतिष्ठान संचलित
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ओंदे, ता.विक्रमगड, जि.पालघर, पिन - ४०१ ६०५
(मुंबई विद्यापीठाशी संलग्न)

**स्वच्छ, सुंदर, निरोगी, सुदृढ व बलवान भारताची निर्मिती...**

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून स्वच्छताविषयक माहितीचे संकलन.

**प्रवेश घेताना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांना असणाऱ्या स्वच्छताविषयक सवयी तसेच त्यांच्या घरी असणाऱ्या स्वच्छता विषयक सुविधांची माहिती भरण्याचा नमुना.**

| | |
|---|---|
| १. नाव | |
| २. कायम रहिवासाचा पत्ता | |
| ३. कुटूंबाची माहिती | कुटुंबातील सदस्यांची संख्या -<br>शौचालय वापर करणाऱ्यांची संख्या - |
| ४. शौचालयाची उपलब्धता | आहे ☐ नाही ☐<br>शौचालयाची उपलब्धता नसल्यास कारण : |
| ५. हात धुण्याची सवय | जेवणापूर्वी - आहे ☐ नाही ☐<br>असल्यास - साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐<br>शौचानंतर - आहे ☐ नाही ☐<br>असल्यास - साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐ |
| ६. तुम्ही राहत असलेला गाव तंटामुक्त आहे का ? | होय / नाही.<br>होय असल्यास तुम्ही सभासद आहात काय ? होय / नाही.<br>गाव तंटामुक्त होण्यासाठी तुम्ही प्रयत्न करीत आहात काय ? होय / नाही. |
| **वचननामा** | शौचालयाची आवश्यकता व त्याचा सातत्याने वापर करण्याबाबतचे संस्थेने केलेले आवाहन मी वाचले व त्याबाबतचे महत्व मला मनापासून पटले आहे. मी याचे महत्व माझ्या घरातील सर्वांना समजावून सांगून येत्या तीन महिन्यात माझ्या घरी शौचालय (नसल्यास) बांधेन व सर्वजण त्याचा नियमित वापर करण्याचे वचन मी संस्थेस देत आहे. |

## स्वच्छतादूत वचननामा

**श्रीमान प्राचार्य महोदय,**

मी ____________________

प्रतिज्ञापूर्वक वचन देतो / देते की, स्वच्छतेची आवश्यकता व त्याचा सातत्याने वापर करण्याबाबतचे महाविद्यालयाने केलेले आवाहन मी वाचले असून त्याबाबतचे महत्व मी माझ्या वैयक्तिक जीवनात व माझ्या कुटूंबातील तसेच मी रहातो / ते त्या ठिकाणच्या १० कुटुंबांना समजावून सांगेन. शौचालयाचा वापर व आजुबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मी स्वतः व इतरांना प्रोत्साहीत करेन, असे प्रतिज्ञापूर्वक वचन देत आहे.

विद्यार्थ्यांची स्वाक्षरी

# महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

१. तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक वृंद.

२. निसर्गरम्य परिसर.

३. प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वैयक्तिक लक्ष.

४. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासंबंधीचे संपूर्ण मार्गदर्शन.

५. सुसज्ज व प्रशस्त ग्रंथालय.

६. विविध कला-क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदण्यासाठी प्रोत्साहन.

७. आधुनिक शैक्षणिक संसाधनाचा अध्ययन-अध्यापन प्रक्रीयेत वापर.

८. विद्यार्थीभिमुख शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी.

९. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विशेष लक्ष.

१०. करिअर गाईडन्सचे विशेष मार्गदर्शन.

११. अभ्यासानुवर्ती उपक्रम.